<u>नि.फौ.ख.क्र.३४४/२०१९</u>
<u>नि.क्र.२४</u>

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र.२ यांची जबानी</u>

मी याव्दारे शपथेवर निवेदन करते/करतो की,
माझे नावः-अक्षय बबन जगदाळे.
वयः- ३२ वर्षे, व्यवसायः- व्यापार
राहणारः- आझादनगर, तारदाळ.

<u>अभियोगपक्षातर्फे सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्री.पी.एस.सावंत यांच्या मार्फतः-</u>

**१.** दि.१०/०५/२०१९ रोजी मी खाजगी कामासाठी शहापूर पोलीस ठाण्यात गेलो होतो. पोलिसांनी माझी एका को-या कागदावर सही घेतली. आता मला दाखविण्यात आलेल्या निवेदन पंचनाम्यावरील दोन्ही सह्या माझ्याच आहेत. परंतु त्यातील मजकूर मला माहिती नाही. अ.क्र.१ वर माझी सही आहे. सहीस अनुक्रमे **नि.क्र.२५ व २६** देण्यात येत आहे. असे काही घडले नाही की, माझ्यासमोर कोणताही निवेदन व जप्ती पंचनामा केला नाही.

**(साक्षिदार हा कागदपत्रांप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे साक्षिदाराला उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी सहायक सरकारी अभियोक्ता यांनी मागितली. कागदपत्रे व मागणी विचारात घेवून परवानगी देण्यात आली)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१०/०५/२०१९ रोजी मी शहापूर पोलीस स्टेशनला गेलो. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी आरोपी चेतन हा हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याने माझ्या समक्ष असे निवेदन दिले की, मी अमोल गायकवाड यास लोखंडी पाईपने मारहाण केली आहे ती माझ्या घरी ठेवली आहे ती तुम्हाला काढून देतो. हे म्हणणे खरे नाही की, त्याप्रमाणे आरोपी, पोलीस, दुसरा पंच व मी खाजगी वाहनाने जैन मंदिर मार्गे दत्तनगर, गल्ली नं.१० या ठिकाणी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी आरोपीने राहते घर दाखविले व त्याप्रमाणे आम्ही सर्वजण त्या घरामध्ये गेलो. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपीने लाकडी टेबलच्या खाली ठेवलेली एक लोखंडी पाईप काढून हजर केली व ती लोखंडी पाईप पोलिसांनी त्या ठिकाणी जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, तो वाचून मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी मी आजराजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.एस. एस. मुदगल यांच्या मार्फतः-</u>**

उलटतपास नाकारला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2025.07.14 13:30:02 +0530

दि.११/०७/२०२५.

(श्रीमती. आर.डी. खराटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इचलकरंजी.